# Best Practice 1

| | | |
|---|---|---|
| 1 | **Title of the Practice** | Women Development Cell |
| 2 | **Objectives of the Practice** | • To develop positive self-esteem and confidence in the female students.<br>• To enable to take the right decision in for their lives.<br>• Creating awareness about the need of gender equality.<br>• Eliminating deep rooted beliefs of gender bias and discrimination.<br>• To aware them about their role in society<br>• Spreading awareness among the students about the social, legal and constitutional rights of women in order to prevent the exploitation based on gender. |
| 3 | **The Context** | Development of women is not simply a trendy idea; it is essential in today's society. Despite considerable advancements in women's rights as well as gender equality, there are many problems that prevent women from contributing fully to society and reaching their full potential. Women's rights advocacy, gender equality, and guarantee that women have equal opportunity in all aspects of life are the goals of the worldwide movement known as Women empowerment. It includes the process of giving women the tools, information, and agency they need to take charge of their own lives and make wise choices |
| 4 | **The Practice** | Women Development Cell is the best practice through which we try to achieve the following objectives:<br>• To develop positive self-esteem and confidence in the female students.<br>• To enable to take the right decision in for their lives.<br>• Creating awareness about the need of gender equality. |

| | | |
|---|---|---|
| | | • Eliminating deep rooted beliefs of gender bias and discrimination.<br>• To aware them about their role in society<br>• Spreading awareness among the students about the social, legal and constitutional rights of women in order to prevent the exploitation based on gender.<br>For that our college conducted many Programs and activities as given below-<br>• Financial Literacy Program<br>• Health Check up<br>• Yuvati Sabha Program<br>• Other Activities related to the development |
| | **Evidence of Success** | We received feedback from the students. |
| 6 | **Problems Encountered and Resources Required** | --- |
| 7 | **Notes (Optional)** | --- |

# Financial Literacy Program




दिव्य मराठी धुळे सिटी 04-04-2023

**आवाहन •** विद्यार्थिनींमध्ये केली बँकेच्या कामाविषयी अधिकाऱ्यांनी जागृती

## बँकेच्या खात्याची माहिती देऊ नका

प्रतिनिधी | शिरपूर

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयातर्फे आत्मनिर्भर युवती अभियानांतर्गत विद्यार्थिनींनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या येथील शाखेला भेट दिली. या वेळी विद्यार्थिनींना बँकेच्या कामकाजाची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर कोणालाही बँक खात्याशी निगडित माहिती देऊ नका, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत बँकेची कार्यप्रणाली, डिजिटल व्यवहार, फ्रॉड कॉलच्या माध्यमातून होणारी फसवणूक याबाबत शाखा व्यवस्थापक अमित कुमारसिंग यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, बँक डिजिटलायजेशन विषयी जनजागृती नसल्याने फसवणुकीचे प्रकार वाढले आहे. दिवसेंदिवस बँक प्रणाली विकसित होत असल्याने बँक ग्राहकांनी अपडेट राहाणे गरजेचे असल्याचे आहे. बँक कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांच्या अकाउंटची डिटेल्स दूरध्वनी वरून विचारत नाही. त्यामुळे याविषयी येणारे कॉल फ्रॉड कॉल समजून अधिक भाष्य टाळावे. खात्यासंबंधी कुठलीही माहिती जसे ओटीपी, एटीएम नंबर, सीसीव्ही पिन व इतर माहिती कोणालाही न देता जवळील शाखेची संपर्क साधावा असेही ते म्हणाले. या वेळी बँक ऑफ महाराष्ट्राचे दैनंदिन व्यवहार, वेगवेगळे डिजिटल अॅप व त्यांचे फायदे, विविध कृषी विषयक शेतकरी हिताच्या योजना, कर्ज योजना आदींची माहिती देण्यात आली. या उपक्रमात ४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. युवती सभा प्रमुख प्रा. डॉ. इंदिरा गिरासे, प्रा. डॉ युवराज पवार, प्रा. चंद्रकांत चौधरी आदी उपस्थित होते. युवती सभेच्या प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे यांनी आभार मानले.



शिरपूर येथे जनजागृती उपक्रमात सहभागी विद्यार्थिनी.

## Atmnirbhar Abhiyan




देशोन्नती

# एच.आर.पटेल महिला महाविद्यालय आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत भेट

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शिरपूर** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत विद्यार्थिनींनी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिरपूरला भेट देण्यात आली.

यावेळी बँकेच्या विविध कार्यप्रणाली, डिजिटल व्यवहार, तसेच फ्रॉड कॉलच्या माध्यमातून होणारे नुकसान याबाबत शाखा व्यवस्थापक अमित कुमार सिंग व सहाय्यक यांनी विद्यार्थिनींना सविस्तर माहिती दिली. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिरपूरचे व्यवस्थापक अमित कुमार सिंग हे विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की बँक व्यवहाराबाबत जसे डिजिटलायजेशन बाबतीत विशेष जनजागृती नसल्याने बँक ग्राहकांसोबत विविध फसवणुकीचे प्रकार सर्रास घडवून ग्राहकांचे प्रसंगी मोठे आर्थिक नुकसान होत असते. दिवसेंदिवस बँक व्यवहारांची कॅशलेस प्रणाली विकसित होत असताना बँक ग्राहकांनी समयानुरूप अपडेट असणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी



व्यक्त केले. बँक कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांच्या अकाउंटची डिटेल्स दूरध्वनी वरून विचारत नसून, याबाबत येणारा कॉल हा फ्रॉड कॉल समजून त्यासोबत अधिक भाष्य टाळावे. आपल्या खात्यासंबंधी कुठलीही माहिती जसे, ओटीपी, एटीएम नंबर, सीसीव्ही पिन व इतर कुठलीही माहिती न देता त्याबाबत आपल्या जवळील शाखेची संपर्क साधून आपल्या बँक अधिकाऱ्यांना तशी माहिती तात्काळ दिल्यास ग्राहकांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा सहाय्यक यांनी कॅश अकाउंट वर चालणारे दैनंदिन व्यवहार वेगवेगळ्या डिजिटल ?प व त्यांचे फायदे, विविध कृषी विषयक शेतकरी हिताच्या योजना, ट्रॅक्टर साठी कर्ज, शेती अवजार वितरणासाठी शासनाची योजना तसेच झिरो बॅलन्स वर खाते उघडणे, शासन विद्यार्थ्यांसाठी राबत असलेल्या विविध विद्यार्थी हिताच्या योजना, जसे शैक्षणिक कर्ज सेविंग अकाउंट, दाम दुप्पट योजना, बचत योजना, मिनिमम बॅलन्स, एटीएम कार्डचा योग्य वापर, इत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर भेटीसाठी एकूण ४० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे, प्रा. डॉ युवराज पवार, प्रा. चंद्रकांत चौधरी यांनी विद्यार्थिनी सोबत बँकेला भेट दिली. सदर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे सर्व कर्मचारी वृंद यांचे अनमोल सहकार्य लाभले. शिरपूर शाखेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी केलेले सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल युवती सभा प्रमुख डॉ.इंदिरा गिरासे महिला कार्यक्रम अधिकारी यांनी आभार मानले.

Deshonnati Edition
Apr 1, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**Jodo Karate Program**




देशोन्नती

# पटेल कला महाविद्यालयात कराटे प्रशिक्षण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शिरपूर** n श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग आणि युवती सभेच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवस कराटे प्रशिक्षण घेण्यात आले.

बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग, श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग आणि युवती सभेच्या संयुक्त विद्यमाने मिशन साहसी शिबिर अभियानांतर्गत पाच दिवस कराटे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सदर कराटे प्रशिक्षण २८ फेब्रुवारी ते ४ मार्च दरम्यान घेण्यात आले. तर ४ मार्च २०२३ रोजी सकाळी दहा वाजता शिबिराचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून साई कम्प्युटरचे संचालक हेमराज पाटील उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. शारदा शितोळे होत्या. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य गजानन पाटील, युवती सभेच्या प्रमुख प्रा. डॉ. इंदिरा गिरासे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.एल.झेड.पाटील उपस्थित होते. सदर कार्यक्रमात ४० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला असून कराटे प्रशिक्षक जयसिंग पाडवी यांनी स्वसंरक्षणाचे महत्त्व समजावून प्रशिक्षण दिले.

Deshonnati Edition
Apr 1, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## Health Checkup Program

दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित,
श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर जि.धुळे (MS) 425405

अध्यक्ष
मा. आ. अमरीशभाई पटेल

प्राचार्या
डॉ.शारदा जे. शितोळे

## वैद्यकीय तपासणी अहवाल 2022-23

आमच्या महाविद्यालयात विद्यापीठाच्या आदेशानुसार विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आमच्या महाविद्यालयात वैद्यकीय तपासणीचे काम डॉ.वर्षा श्रीकांत वाडिले यांनी केले. डॉ. वर्षा वाडिले आमच्या महाविद्यालयातील (Health Centre) आरोग्य केंद्र अंतर्गत विद्यार्थीनींच्या आरोग्य विषयीचे काम पाहतात. महाविद्यालयास त्याचे सतत सहकार्य मिळत असते. वैद्यकीय तपासणीसाठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आले होते.

| तारीख | वेळ | वर्ग | एकुण विद्यार्थीनी |
|---|---|---|---|
| 18/11/2022 | 2.00 ते 5.30 | FYBA वर्गातील रोल नं. 1 ते 80 विद्यार्थीनी | 80 |
| 19/11/2022 | 2.00 ते 5.30 | FYBA 80 ते 160 | 80 |
| 21/11/2022 | 2.00 ते 5.30 | FYBA वर्गातील 160 च्या वर | 43 |
| | | एम.ए. च्या विद्यार्थीनी | 40 |
| | | ------------------- | ---------- |
| | | एकुण | 243 |

दि.18,19 व 21 नोव्हेंबर 2022 रोजी प्रथम वर्षाच्या 203 व एम.ए.च्या 40 एकुण 243 विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

वैद्यकीय तपासणीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.शारदा जे. शितोळे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील, युवती सभा प्रमुख डॉ.इंदिरा गिरासे तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर वर्गाचे सहकार्य मिळाले.

विद्यार्थी विकास अधिकारी
दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित
श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय,
शिरपूर जि. धुळे (महाराष्ट्र)

प्राचार्या
दि.शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित
श्रीमती एच.आर.पटेल कला महिला
महाविद्यालय शिरपूर,जि.धुळे ४२५ ४०५

Scanned with CamScanner


WEL-COME
GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
9V2M+P6P, Ambika Nagar, Shirpur, Shirpur-Warwade, Maharashtra 425405, India
Lat 21.351556°
Long 74.883077°
30/10/23 02:08 PM GMT +05:30
11.63 km/
6.25 m
164 m
Google


GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
R.C.Patel. Main Building, 9V2M+M8X, Ambika Nagar, Shirpur, Shirpur-Warwade, Maharashtra 425405, India
Lat 21.351476°
Long 74.883125°
30/10/23 02:07 PM GMT +05:30
11.63 km/
13.64 m
164 m
Google

# Other Activities Photos



**Atmnirbhar and Karate Program**







SHIRPUR EDUCATION SOCIETY
RAJGOPAL CHANDULAL BHANDARI HALL


SHIRPUR EDUCATION SOCIETY
RAJGOPAL CHANDULAL BHANDARI HALL
GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
R.C.Patel. Main Building, 9V2M+M8X, Ambika Nagar, Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.351599°
Long 74.883404°
04/03/23 10:38 AM GMT +05:30
Google


विद्यार्थी विकास विभाग
श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे
युवती सभा व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने
GPS Map Camera
Wadi Kh., Maharashtra, India
FV66+G9F, Wadi Kh., Maharashtra 425405, India
Lat 21.462346°
Long 74.861318°
20/03/23 09:40 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
12, near COTTAGE HOSPITAL, Subhash Colony, Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.355541°
Long 74.883735°
23/03/23 10:52 AM GMT +05:30
Google


श्रीमती एच.आर.पटेल कला महिला
GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
12, near COTTAGE HOSPITAL, Subhash Colony, Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.355792°
Long 74.883926°
23/03/23 10:54 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirpur, Maharashtra, India
12, near COTTAGE HOSPITAL, Subhash Colony,
Shirpur, Maharashtra 425405, India
Lat 21.355559°
Long 74.883799°
23/03/23 10:53 AM GMT +05:30
Google


विद्यार्थी विकास विभाग
श्रीमती एच.आर.पटेल कला महिला
महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे
युवती सभा व विद्यार्थी विकास विभाग
यांच्या संयुक्त विद्यमाने
" आत्मनिर्भर युवती अभियान "


SHIRPUR EDUCATION SOCIETY
RAJGOPAL CHANDULAL BHANDARI HALL

Shirpur Education Society's
H. R. Patel Arts Mahila College Shirpur
NAAC Re-Accredited "B++" Grade

Hon. Amrishbhai Patel
President
Dr. Sharda Shitole
Principal

Outward/HRP/2023-24

## मिशन साहसी शिबिर अभियान_ "जुडो कराटे "चा वार्षिक अहवाल शै. वर्ष 2022 – 23

शैक्षणिक वर्ष 2022 _23 या वर्षात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन साहसी शिबिर अभियान" जुडो कराटे" या पाच दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन दिनांक 28 फेब्रुवारी 2023 रोजी डॉ. शारदा शितोळे मॅम यांच्या शुभहस्ते करण्यात आले .उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. एल .झेड .पाटील उपस्थित होते. दिनांक 28 फेब्रुवारी 2023 ते 4 मार्च 2023 या कालावधीत रोज सकाळी दोन तास 10.15 ते 12.15 या वेळेत ,"ज्यूडो कराटेचे" प्रशिक्षण प्रशिक्षक श्री जयसिंग पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. कार्यशाळेत 40 विद्यार्थिनीचा सहभाग होता .श्री जयसिंग पाडवी यांनी विद्यार्थिनींना जुडो कराटेचे महत्त्व पटवून देऊन पाच दिवसापर्यंत रोज दोन तास मार्गदर्शन करून एरोबिक, फिजिकल फिटनेस हे नॉलेज दिले .आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी लागणाऱ्या छोट्या छोट्या हालचाली शिकविल्या .बेसिकची सुरुवात रनिंग ने करून जम्पिंग करणे, साईट सीटअप, डीप्स स्टमक कंडिशन, कमरेची हालचाल, डोक्याची, खांद्याची, डोळ्यांची हालचाल कशी करावी ते शिकवले.

समारोप प्रसंगी बोलताना साई कम्प्युटरचे संचालक हेमराज पाटील म्हणाले की, विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास आणि एकाग्रता ही शारीरिक सुदृढतेवर अवलंबून असून त्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयाने आयोजित केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याने आपण सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा व हे प्रशिक्षण आत्मसात करावे. उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील सरांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणातून प्राचार्य डॉ. शारदा शितोळे म्हणाल्या की विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर होऊन त्यांच्या आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांचे मनोबल वाढवून त्यांच्यामध्ये कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची मानसिकता निर्माण करण्याच्या हेतूने या कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते .

युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे यांनी प्रास्ताविकातून या कार्यशाळे मागचा हेतू सांगितला. त्याचप्रमाणे प्रशिक्षक श्री पाडवी यांनी डाऊन किक, चेस्ट की, फेस किक यांचा कसा वापर करावा, स्वतःच्या बचावासाठी प्रसंगावधान राखून उचलून फेकणे, पाडणे स्वतःचा तोल सावरून कमरेत हात घालून कसे पाडावे ,कॉलर पकडून कसे पाडावे ,एक हात पकडून कसे पाडावे ,पायात पाय अडकवून कसे पाडावे, या कला शिकविल्या पाच दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेचा समारोप दिनांक 4 मार्च 2023 रोजी प्राचार्य डॉ. शारदा शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी भाग्यश्री गिरासे या विद्यार्थिनीने केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन युवती सभा प्रमुख डॉ.इंदिरा गिरासे यांनी केले. कुमारी नेहा भावसार .जयश्री पाटील. दिव्या खोंडे यांनी मनोगत व्यक्त केले .तर कुमारी भाग्यश्री गिरासे हिने आभार व्यक्त केले.

डॉ.इंदिरा गिरासे
युवती सभा प्रमुख

डॉ.शारदा जे.शितोळे

CamScanner

Outward/HRP/2023-24

# **युवती सभा वार्षिक अहवाल**
## शैक्षणिक वर्ष 2022 - 23

शैक्षणिक वर्ष 2022 -23 या वर्षात युवती सभा एककाचे उद्घाटन डॉ. श्वेता बेलगमवार (आहार तज्ञ उपजिल्हा रुग्णालय शिरपूर )यांच्या शुभहस्ते करण्यात आले .उद्घाटन प्रसंगी विद्यार्थिनींना अनमोल मार्गदर्शन करून विविध क्षेत्रात चमकलेल्या युवतींची उदाहरणे देऊन आपणही असेच प्रगतीच्या क्षेत्राकडे वाटचाल करत रहा म्हणून शुभेच्छा दिल्या .तसेच प्रत्येकाने आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आहार उत्तम असेल तरच तुमच्या आरोग्य नीट राहील. असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्राचार्य डॉ. शारदा शितोळे यांनी भूषविले. त्यांनीही आपले अध्यक्षीय भाषणातून आपले विचार मांडले. युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे यांनी युवती सभे मागचा उद्देश विद्यार्थ्यांना सांगितला. वर्षभरात जे जे उपक्रम घेतले जातील त्यात हिरीरीने भाग घ्या. व संधीचे सोने करा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी स्नेहा जाधव या विद्यार्थिनीने केले. तर कुमारी सविता सोनवणे हिने आभार मानले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन साहसी शिबिर अभियान" जुडो कराटे" या पाच दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन दिनांक 28 फेब्रुवारी 2023 रोजी डॉ. शारदा शितोळे मॅम यांच्या शुभहस्ते करण्यात आले .उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. एल .झेड .पाटील उपस्थित होते. दिनांक 28 फेब्रुवारी 2023 ते 4 मार्च 2023 या कालावधीत रोज सकाळी दोन तास 10.15 ते 12.15 या वेळेत ,"ज्यूडो कराटेचे" प्रशिक्षण प्रशिक्षक श्री जयसिंग पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. कार्यशाळेत 40 विद्यार्थिनीचा सहभाग होता .श्री जयसिंग पाडवी यांनी विद्यार्थिनींना जुडो कराटेचे महत्त्व पटवून देऊन पाच दिवसापर्यंत रोज दोन तास मार्गदर्शन करून एरोबिक, फिजिकल फिटनेस हे नॉलेज दिले .आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी लागणाऱ्या छोट्या छोट्या हालचाली शिकविल्या .बेसिकची सुरुवात रनिंग ने करून जम्पिंग करणे, साईट सीटअप, डीप्स स्टमक कंडिशन, कमरेची हालचाल, डोक्याची, खांद्याची, डोळ्यांची हालचाल कशी करावी ते शिकवले.

समारोप प्रसंगी बोलताना साई कम्प्युटरचे संचालक हेमराज पाटील म्हणाले की, विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास आणि एकाग्रता ही शारीरिक सुदृढतेवर अवलंबून असून त्या दृष्टीने विद्यापीठ व महाविद्यालयाने आयोजित केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याने आपण सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा व हे प्रशिक्षण आत्मसात करावे. उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील सरांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणातून प्राचार्य डॉ. शारदा शितोळे म्हणाल्या की विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर होऊन त्यांच्या आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांचे मनोबल वाढवून त्यांच्यामध्ये कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची मानसिकता निर्माण करण्याच्या हेतूने या कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते .युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे यांनी प्रास्ताविकातून या कार्यशाळे मागचा हेतू सांगितला. त्याचप्रमाणे प्रशिक्षक श्री पाडवी यांनी डाऊन किक, चेस्ट की, फेस किक यांचा कसा वापर करावा, स्वतःच्या बचावासाठी प्रसंगावधान राखून उचलून फेकणे ,पाडणे स्वतःचा तोल सावरून कमरेत हात घालून कसे पाडावे ,कॉलर पकडून कसे पाडावे ,एक हात

CamScanner

पकडून कसे पाडावे ,पायात पाय अडकवून कसे पाडावे, या कला शिकविल्या पाच दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेचा समारोप दिनांक 4 मार्च 2023 रोजी प्राचार्य डॉ. शारदा शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी भाग्यश्री गिरासे या विद्यार्थिनीने केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन युवती सभा प्रमुख डॉ.इंदिरा गिरासे यांनी केले. कुमारी नेहा भावसार .जयश्री पाटील. दिव्या खोंडे यांनी मनोगत व्यक्त केले .तर कुमारी भाग्यश्री गिरासे हिने आभार व्यक्त केले.

दिनांक 8 मार्च 2022 रोजी युती सभे अंतर्गत आमच्या महाविद्यालयात महिला दिवस व माता मेळावा साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी माननीय राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्या भैरवी शिरसाठ उपस्थित होत्या प्रमुख वक्त्या म्हणून डॉक्टर रजनी लोणचे मॅडम यांनी महिलांचे अस्तित्व त्यांचे अधिकार चूल व मूल बंधनात अडकलेली स्त्री तसेच शिक्षण मिळाल्यानंतर स्वतंत्र झालेली नाही व आज वर्तमानात नारीचे शैक्षणिक योगदान याबद्दल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी भरभरून माता पालकांचा प्रतिसाद मिळाला माता पालकांनी मुलींची विशेष काळजी घ्यावी याबद्दल देखील मार्गदर्शन करण्यात आले.-

*आत्मनिर्भर युवती अभियान अंतर्गत दिनांक 20 मार्च ते 29 मार्च दरम्यान विविध शासकीय कार्यालयांना भेट दिली. त्यात

* दिवस१_आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत दि.20 मार्च रोजी विद्यार्थिनींची पोलीस स्टेशनला भेट.

वाढती सायबर गुन्हेगारी समाजासाठी धोकेदायक असून सावधानता हेच बचावाचे मुख्य उपाय असल्याचे सुतोवाच तालुक्यातील शिरपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अंसाराम आगरकर यांनी श्रीमती एच. आर .पटेल कला महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींना सायबर गुन्हेगारी बद्दल मार्गदर्शन करताना काढले .कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व श्रीमती एच. आर .पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थिनींना शिरपूर पोलीस स्टेशन येथे 'सायबर क्राईम 'या विषयावर अंसाराम आगरकर (पोलीस उपनिरीक्षक शिरपूर पोलीस ठाणे) यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. वाढती सायबर गुन्हेगारी, महिलांना येणारे निनावी फोन कॉल्स, रोड रोमिओद्वारा महिलांना होणारा त्रास ,तसेच महिलांच्या हितासाठी असलेल्या कायद्यांबाबत विद्यार्थिनींना सविस्तर माहिती दिली .तसेच पौर्णिमा पाटील मॅडम यांनी एफ. आय .आर, गोपनीय विभागातील कार्यप्रणाली, वायरलेस यंत्रणा, विविध गुन्हे , याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले .सदरक्षेत्र भेटीसाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉक्टर एल. झेड.पाटील, प्राध्यापिका मनीषा चौधरी, युवती सभा प्रमुख इंदिरा गिरासे व महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

* दिवस २_आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत दि.21 मार्च रोजी विद्यार्थिनींची बँकेस भेट.....

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व श्रीमती एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत विद्यार्थिनींनी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिरपूर ला भेट देऊन बँकेच्या विविध कार्यप्रणाली ,डिजिटल व्यवहार, तसेच फ्रॉड कॉलच्या माध्यमातून होणारे नुकसान याबाबत शाखा व्यवस्थापक अंकित शहा व सहाय्यक यांनी विद्यार्थिनींना सविस्तर माहिती दिली. बँक ऑफ महाराष्ट्र शाखा शिरपूरचे व्यवस्थापक अंकित शहा सर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की ,बँक व्यवहाराबाबत जसे डिजिटलायजेशन बाबतीत विशेष जनजागृती नसल्याने बँक ग्राहकांसोबत विविध फसवणुकीचे प्रकार सर्रास घडवून ग्राहकांचे प्रसंगी मोठे आर्थिक नुकसान होत असते. दिवसेंदिवस बँक व्यवहारांची कॅशलेस प्रणाली विकसित होत असताना बँक ग्राहकांनी समयानुरूप अपडेट असणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. बँक कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांच्या अकाउंट ची डिटेल्स दूरध्वनी वरून विचारत नसून, याबाबत येणारा कॉल हा फ्रॉड कॉल समजून त्यासोबत अधिक भाष्य टाळावे .आणि आपल्या खात्यासंबंधी कुठलीही माहिती जसे ,ओटीपी

Smt.H.R.Patel Arts Mahila ... Shirpur

CamScanner

,एटीएम नंबर, सीसीव्ही पिन व इतर कुठलीही माहिती न देता त्याबाबत आपल्या जवळील शाखेची संपर्क साधून आपल्या बँक अधिकाऱ्यांना तशी माहिती तात्काळ दिल्यास ग्राहकांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते. असे त्यांनी सांगितले .

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा सहाय्यक यांनी कॅश अकाउंट वर चालणारे दैनंदिन व्यवहार वेगवेगळ्या डिजिटल ॲप व त्यांचे फायदे ,विविध कृषी विषयक शेतकरी हिताच्या योजना, ट्रॅक्टर साठी कर्ज, शेती अवजार वितरणासाठी शासनाची योजना ,तसेच झिरो बॅलन्स वर खाते उघडणे ,शासन विद्यार्थ्यांसाठी राबत असलेल्या विविध विद्यार्थी हिताच्या योजना, जसे शैक्षणिक कर्ज सेविंग अकाउंट, दाम दुप्पट योजना, बचत योजना, मिनिमम बॅलन्स, एटीएम कार्डचा योग्य वापर, इत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले . महाविद्यालयातील युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे , प्रा. डॉ युवराज पवार, प्राध्यापक चंद्रकांत चौधरी यांनी विद्यार्थिनी सोबत बँकेला भेट दिली.

•दिवस ३_आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत दि.23 मार्च रोजी विद्यार्थिनींची उपजिल्हा रुग्णालयास भेट.

आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत शिरपूर उपजिल्हा रुग्णालयाला भेट दिली. तेथील डॉक्टर ध्रुवराज वाघ सरांनी महिलांचे आरोग्य, रुग्णालयातील कामकाज ,तेथे उपलब्ध असलेल्या सुविधा, कोणत्या आजारावर कोणते डॉक्टर उपचार करतात त्याबद्दल माहिती दिली. उपजिल्हा रुग्णालयातील बाल आरोग्य विभाग, महिला आरोग्य विभाग, जनरल वार्ड ,अतिदक्षता विभाग, याबद्दल देखील माहिती दिली. तसेच रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची व्यवस्था कशाप्रकारे राखली जाते याबद्दलही विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थिनींना प्राथमिक उपचार कसे करावे ?स्वतःचे आरोग्य कसे सांभाळावे? याबद्दलही सरांनी विशेष माहिती दिली.

सदर क्षेत्र भेटीसाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. एल. झेड. पाटील, प्राध्यापिका मनीषा चौधरी ,युवती सभाप्रमुख इंदिरा गिरासे व महाविद्यालयातील ४० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

• दिवस ४_आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत दि.25 मार्च रोजी शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट.

आत्मनिर्भर युवती अभियाना अंतर्गत शिरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली .त्यावेळी बाजार समितीचे वसंत बुवा यांनी विद्यार्थिनींना सर्व धान्यांबद्दल माहिती दिली. तसेच तेथे होणाऱ्या धान्यांच्या खरेदी विक्री बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. वेगवेगळ्या प्रकारचे कडधान्य, उच्च प्रतीचे उत्पादन, तसेच योग्य त्या प्रतवारीचे धान्य कसे ओळखावे ,फसवणुकीपासून कसे सावध व्हावे, याबद्दल सविस्तर माहिती दिली. कृषी उत्पन्न बाजार समिती बाजारात होणाऱ्या वेगवेगळ्या खरेदी विक्री बाबत विद्यार्थिनींना माहिती दिली. तसेच त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचाही अहवाल दिला.

सदर क्षेत्रभेटीसाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक बी. आय .परदेशी,प्रा. चंद्रकांत चौधरी, युवती सभाप्रमुख इंदिरा गिरासे व महाविद्यालयाच्या ४० विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

• दिवस ५_समारोप समारंभ

आत्मनिर्भर युवती अभियानाचा समारोप समारंभ दिनांक २९मार्च रोजी करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षा कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शारदा शितोळे ,उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील ,युवती सभा प्रमुख डॉ. इंदिरा गिरासे , विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ.एल. झेड .पाटील व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.शारदा शितोळे मॅडम यांनी पाच दिवसीय क्षेत्र भेटीबद्दल विद्यार्थिनींची हितगुज केले व त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या.

Phitole

CamScanner

Outward/HRP/2023-24

# विद्यार्थी विकास विभागाचा वार्षिक अहवाल शै.वर्ष 2022-23

आमच्या श्रीमती एच आर पटेल कला महिला महाविद्यालय, शिरपूर येथे विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून डॉ.एल.झेड.पाटील व महिला विकास अधिकारी डॉ.इंदिरा गिरासे यांनी शै.वर्ष 2022-23 या वर्षात विद्यापीठाच्या आदेशानुसार केलेल्या कामाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

स्वांतत्रयाच्या अमृत महोत्सव अंतर्गत आमच्या महाविद्यालयात विद्यापीठाने खालील उपक्रमांना मान्यता दिली होती

1. एक शाम देश के नाम
2. मॅरेथॉन
3. पुस्तक प्रकाशन
4. निबंध लेखन
5. व्याख्यान
6. चर्चासत्र कार्यशाळा

   महाविद्यालयात वरील सर्व कार्यक्रमाचे व्यवस्थित नियोजनानुसार कार्यवाही करण्यात आली.
7. कबचौउमवि/14/विवि-शाऊ-52/177/2022, दि.23/05/20222 नुसार शिवस्वराज्य दिन दि.06/06/2022 रोजी साजरा करण्यात आला.
8. कबचौउमवि/14/विवि/232/2022, दि.03/04/2022 नुसार दि.09 आगॅस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा व क्रांतीकारकांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्यावर विचार मंथन केले. अहवाल विद्यापीठास सादर करण्यात आला.
9. कबचौउमवि/14/विवि/विउ/224/2022,दि.25/07/2022 नुसार आमच्या महाविद्यालयात दि.11 ऑगस्ट विद्यापीठ नामविस्तार दिवस आणि दि.15 ऑगसट साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे 02 फोटो व अहवाल विद्यापीठास सादर करण्यात आला.
10. कबचौउमवि/14/विवि-शाउ-52/233/2022, दि.03/08/2021 नुसार आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव व हर घर तिरंगा" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यात दि.09 ऑगस्ट रोजी सकाळी 11.00 वाजता सामूहिक राष्ट्रगीत गाण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. दि.10 ऑगस्ट रोजी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. दि.28/09/2022 रोजी SPDM महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा आयोजित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातील दोन विद्यार्थीनींनी त्यात सहभाग नोंदविला
11. कबचौउमवि/14/शाउ-9/286/2022, दि11/10/2022 नुसार माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा दि.15 ऑक्टों हा जन्म दिवस "वाचन प्रेरणा दिवस" म्हणून साजरा करण्यात आला.
12. दि.15 ऑक्टोबर 2022 रोजी स्वांतत्रयाचा "अमृत महोत्सव निमित्त "एक शाम देश के नाम" या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक मा.डॉ.सुनिल कुळकर्णी सर उपस्थित होते.

CamScanner

13. कबचौउमवि/14/विवि/विवैत260/2022, दि.10/09/2022 महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला वर्गातील -203 विद्यार्थीनी व एम.ए.वर्गातील व एम.ए.वर्गातील 25 विद्यर्थीनीची डॉ.वर्षा वाडिले यांचा मार्गदर्शनाने वैद्यकीय तपासणी करून अहवाल विद्यापीठात सादर करण्यात आला.
14. कबचौउमवि/14/विवि-शाउ-52/305/2022, दि.11/11/2022 नुसार महाविद्यालयात क्रांतीवीर बिरसा मुंडा जयंती दि.15/11/2022 रोजी साजरा करण्यात आली.जिओ टॅग फोटो व अहवाल विद्यापीठास सादर करण्यात आला.
15. कबचौउमवि/अविष्कार/2/2022, दि.09/09/2022 नुसार एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय, ता.शिंदखेडा जि. धुळे येथे दि.18/10/2022 रोजी अविष्कारचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील दोन विद्यार्थीनींनी त्यात सहभाग नोंदविला. त्यांनी शिरपूर जल संवर्धन एक आदर्श व जागतिक तापमान वाढ व शाश्वत विकास या विषयावर पोस्टर्स सादरीकरण केले.
16. कबचौउमवि/14/युम-33/15/2023, दि.23/09/2023 नुसार धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर ता.यावल येथे दि.09 ते 13 फेब्रुवारी 2023 या कालवधीत युवारंगाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील 05 विद्यार्थीनींनी वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी,मेंहदी व स्पॉट पेटिंग स्पर्धेत सहभाग नोंदविला
17. कबचौउमवि/14/विवि/आदुध-29/315/2022,दि.25/11/2022नुसार महाविद्यालयातील गरजू, अनाथ,गरीब एकुण 12 विद्यार्थीनींनी आर्थिक दुर्बल या योजनेचा लाभ मिळाला.
18. कबचौउमवि/14/विवि-48/287/2022, दि.12/10/2022 नुसार महाविद्यालयातील गरजू, अनाथ,गरीब, होतकरू विद्यार्थीनींना या योजनेत सहभागी केले जाते. महाविद्यालयाच्या पट संख्येनुसार विद्यापीठाने 08 विद्यार्थी संख्येस मान्यता दिली होती. या योजनेची सुरूवात 15 ऑक्टोबर पासून झाली. फेब्रुवारी पर्यंत मुलींनी सहभाग नोंदविला विद्यार्थीनींना प्रत्येक महिन्याच्या चेक नुसार मानधन देण्यात आले.
19. कबचौउमवि/14/विवि-46/296/2022, दि.21/10/2012 नुसार आमच्या महाविद्यालयास आत्मनिर्भर युवती अभियान व मिशन साहस शिबीरास विद्यापीठाकडून मान्यता मिळाली त्यानुसार मिशन साहसी शिबीर अंतर्गत दि.28/02/2023 ते दि04/03/2023 या कालवधीत ज्युडो कराटे प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यक्रमात कराटे प्रशिक्षक श्री.जयसिंग पाडवी सरांनी मार्गदर्शन केले होते. एकुण 40 विद्यार्थीनींनी त्यात सहभाग घेतला होतो. आत्मनिर्भर युवती अभियानात पोलिस स्टेशनला भेट , बँक ऑफ महाराष्ट्र भेट, उपजिल्हा रूग्णालयभेट, कृषी उत्पन्न बाजर समितीला भेट, सायबर सिक्युरीटी जनजागृती व्याख्यान इ.उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या एकुण 40 विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.सुनिल कुळकर्णी यांनी महाविद्यालयास वेगवेगळया योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला व वर्षभर सहकार्य केले त्याबददल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शारदा जे. शितोळे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांचे अनमोल सहकार्य लाभले त्याबददल मी सर्वाचे आभार व्यक्त करतो.

Shitole

CS CamScanner

Outward/HRP/2023-24

# राष्ट्रीय सेवा योजनेचा वार्षिक अहवाल शै.वर्ष 2022-23

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळण्यास 75 वर्ष झालेत. यामुळे आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. दि.08 ऑगस्ट 2022 या दिवशी रा.से.योननेच्या दतक गांव गरताड ता. शिरपूर येथे "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी तेथील आर.सी.पटेल माध्यामिक शाळेच्या सोबत रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी गरताड गावाचे सरपंच सुनंदाबाई नथ्थू ठाकरे, सौ रेणूका महेश लोहार, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ग्रामस्थ माध्यामिक व जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दि.09 ऑगस्ट 2022 शासनाच्या आदेशानुसार "स्वराज्य महोत्सव" अंतर्गत सकाळी 11.00 वाजता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी सामूहिक राष्ट्रगीत गायनासाठी उपस्थित होते.

दि.10 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत एकुण 12 विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला होता.

दि.11 ऑगस्ट 2022 विद्यापीठ नामविस्तार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मा.प्राचार्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन केले व प्रथम वर्ष कला या वर्गाची विद्यार्थीनी जयश्री रोहिदास पाटील हिने कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे अरे संसार संसार हे गीत सादर केले. तसेच पर्यावरणावर आधारित प्रतिज्ञा आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला एफ.वाय.बी.ए. वर्गाच्या विद्यार्थीनी व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी होते.

दि.15 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालयात वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आमच्या संस्थेचे अध्यक्ष माजी शालेय शिक्षण मंत्री मा.आ.भाईसो अमरिशभाई रसिकलाल पटेल यांच्या शुभहस्ते कार्यक्रम पार पाडला. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्या, उपप्राचार्य प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

दि.17 ऑगस्ट 2022 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्त्र महाराष्ट्र विद्यापीठाच्या कबचौउमवि/2/स्वा.अ.म/248/2022, दि.13/08/2022 च्या परिपत्रकानुसार सकाळी 11.00 वाजता सामूहिक राष्ट्रगीत गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकाकातर्फे अनंत चतुर्दशी निमित्ताने होणाऱ्या गणेश विसर्जनाच्या ठिकाणी रासेयो स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी आणि प्राध्यापकांनी गणेश विसर्जन वेळी निर्माल्य संकलन आणि गणेश मूर्ती संकल न केले.आणि गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांना विसर्जन करण्यात मदत केली. तसेच आलेल्या लहान मुलांव

CamScanner

र वैयक्तिक लक्ष ठेवून कोणतेही अनुचित प्रकार होणार नाही,याची काळजी घेतली. एन.एस.एस.कार्यक्रम अधिका री डॉ.रवी मोरे, सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा.बी. आय.परदेशी, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनिता आचार्य,एन. एस. एस.विद्यार्थीनी स्वयंसेवक यांनी परिश्रम घेत परिसर स्वच्छ केला.आणि भविष्यात पर्यावरणाचे संतुलन राखण्या चा संकल्प केला.

दि.१०.९.२२ रोजी गझल मंथन साहित्य संस्था धुळे (शिरपूर)आणि श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग,मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी गझल मुशायराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्राचार्या डॉ.शारदा शितोळे, संजय गोरडे, नाशिक हेमलताताई पाटील शहादा श्रीमती अनिता खैरनार डॉ.रवी मोरे डॉ.युवराज पवार उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सुरेश भटांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमांची सुरुवात झाली. विष्णु जोंधळे यांनी गझल निर्मिती संदर्भात आपले मत व्यक्त केले.

महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षणमंत्री तथा आमदार अमरीशभाई पटेल यांच्या 70 व्या वाढदिवसानिमित्त बुधवार दिनांक 14.9. 22 रोजी श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर येथे गरजू विद्यार्थिनींना व आदिवासी विद्यार्थिनींना एन.एस.एस.विभागामार्फत 30 विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले.यावेळी महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शारदा शितोळे यांच्या हस्ते व क्रीडा विभाग प्रमुख डॉ.विनय पवार व राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.रवी मोरे यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले उपप्राचार्य गजानन पाटील सोबत एन.एस.एस. सहकारी प्रा.बी.आय.परदेशी सहाय्यक महिला अधिकारी डॉ.सुनितीआचार्य याचबरोबर महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होते.

दि.21.9.2022 रोजी आंतरराष्ट्रीय शांतता दिवस एन. एस.एस.विभागामार्फत साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.शारदा शितोळे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे यांनी आयोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बी. आय.परदेशी व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सौ.एम.व्ही.चौधरी मॅडम इ. उपसिथत होते.

दि.24.9.22 रोजी राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम हा शिरपूर तहसील कार्यालयात स्वच्छता मोहीम विद्यार्थिनींनी राबवली.सदर कार्यक्रमास मा.तहसीलदार पुरवठा अधिकारी श्रीमती प्राजक्ता सोलंमकर,नरेंद्र नाईक,युवराज कोळी, सहकारी बंधु.राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवी मोरे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.बी.आय.परदेशी,डॉ.सुनीतीआचार्य उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शारदा शितोळे मॅडम यांनी केले.उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील यांनी सुद्धा स्वच्छते संबंधी मार्गदर्शन केले.सदर स्वच्छते मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.सदर मोहिमेत डॉ.आर.एम.वाडीले, डॉ.एल.झेड. पाटील,डॉ. एच.आर.चौधरी, डॉ.ए.पी.खोसे, प्राध्यापिका मनीषा चौधरी,प्रा.डॉ.युवराज पवार, प्रा.रोहित वाडीले व शिक्षेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.सदर कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रमाधिकारी डॉ.आर. व्ही. मोरे यांनी केले.तर आभार प्रा.बी.आय.परदेशी यांनी केले.

दि027/09/2022 रोजी महाविद्यालयात स्वच्छ हात धुवा मोहिम अतंर्गत सर्व विद्यार्थीनीं व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या कडून हा उपक्रम राबविण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शारदा शितोळे मॅडम यांनी केले.उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील यांनी सुद्धा स्वच्छते संबंधी मार्गदर्शन केले.सदर स्वच्छते मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनीनी सहभाग घेतला.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एक सिंहावलोकन गा विषयावर व्याख्यान संपन्न. शिरपूर : श्रीमती एच.आर. पटेल कला महिला महाविद्यालयात, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एक सिंहावलोकन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन,एन एस.एस विभागाकडून 28.9.22 रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.रवी मोरे यांनी केले.

मानसशास्त्र विभागामार्फ दि.28.9.22 रोजी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव स्त्रियांचे योगदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन मानसशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.रवी मोरे यांनी केले. विद्यार्थिनींना बोलके करावे. त्यांना समाजातील प्रश्न कळावेत.त्यांनी थोर पुरुषांच्या विचारांची कास

CamScanner

[illegible] प्रेरित होऊन हाती लेखणी उचलावी ही निपेक्ष भावना यामागे होती. वक्ता म्हणून डॉ.महेंद्र पाटील [illegible] आलेल्या यशस्वी मुलींचे अभिनंदन करून मानसशास्त्र नेमकं काय आहे.शास्त्र,आत्मा नेमकं काय त्यामध्ये मानसशास्त्राची भूमिका काय जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःला डेव्हलप करता करता इतरांचाही विकास करणे आवश्यक आहे.त्यातूनच आपण त्याचा उपयोग कसा करून घेतो.ही जाणीव मुलींना करून दिली आपले विचार मांडले. जीवनात यशस्वी व्हायचं असेल तर आधी स्वतः सक्षम होणे आवश्यक आहे. आपलं व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारे कसे घडेल हे पाहणे आवश्यक आहे.त्यातूनच आपला मार्ग स्वतः आपल्याला निवडायचा असतो.अशा पद्धतीने त्यांनी मार्गदर्शन केले. ही एक कला, कौशल्ये आहे.असे कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राहूल सनेर,यांनी आपले विचार मांडले.या कार्यक्रमाला सर्व मानसशास्त्राच्या विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

प्रास्ताविक प्रा.बी.आय परदेशी यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ.इंदिरा गिरासे प्राध्यापिका मनीषा चौधरी सहकारी प्राध्यापक उपस्थित होते.आभार डॉ.रवी मोरे यांनी मानले.

श्रीमती एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालयात, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त वक्तृत स्पर्धेचे आयोजन दि.28.9.22 रोजी एन एस.एस विभागाकडून करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.रवी मोरे यांनी केले. विद्यार्थिनींना बोलके करावे. त्यांना समाजातील प्रश्न कळावेत.त्यांनी थोर पुरुषांच्या विचारांची कास धरावी.त्यांनी प्रेरित होऊन हाती लेखणी उचलावी ही निपेक्ष भावना यामागे होती. परीक्षक, वक्ता म्हणून डॉ.महेंद्र पाटील यांनी प्रथम, द्वितीय,तृतीय आलेल्या .

1.सोनवणे सविता प्रवीण
2.सैंदाणे देवयानी विजय
3.जाधव स्नेहा अनार

स्पर्धेतील या यशस्वी मुलींचे अभिनंदन करून वकृत्वाविषयी आपले विचार मांडले. वक्तृत्व ही एक कला, कौशल्ये आहे.असे कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राहूल सनेर,यांनी आपले विचार मांडले . या स्पर्धेला बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा.बी.आय परदेशी यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ.इंदिरा गिरासे डॉ. युवराज पवार प्राध्यापिका मनीषा चौधरी सहकारी प्राध्यापक उपस्थित होते.आभार डॉ.रवी मोरे यांनी मानले.

दि.29.9.22 रोजी गरबा नृत्य कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.विभाग प्रमुख डॉ.रवी मोरे प्रा.बी. आय.परदेशी प्राध्यापिका विद्या पाटील मॅम, प्राध्यापिका मनीषा चौधरी यांनी आयोजन केले.विद्यार्थिनींनी गरबा नृत्य वर वेगवेगळ्या प्रकारचे सादरीकरण केले.

दि.29.9.22 रोजी कार्यक्रम घेण्यात आला.सदर कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी (धुळे)भुवनेश्वरी मॅडम व त्यांचे कर्मचारी यांनी आदिवासी समाजातील समस्या विवाहाचे वय शारीरिक व मानसिक आरोग्य यासंबंधी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शारदा शितोळे मॅम,उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील,समान संधी केंद्राचे समन्वयक (एन.एस.ए.विभाग प्रमुख)डॉ.रवी मोरे,सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा.बी.आय. परदेशी,प्रा. एम.व्ही. चौधरी मॅडम,प्रा.चंद्रकांत चौधरी तसेच महाविद्यालयाच्या बहुसंख्य एसटी संवर्गातील विद्यार्थिनी कार्यक्रमास उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दि.29.9.22 रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.रवी मोरे यांनी केले. विद्यार्थिनींना बोलके करावे. त्यांना समाजातील प्रश्न कळावेत.त्यांनी थोर पुरुषांच्या विचारांची कास धरावी.त्यांनी प्रेरित होऊन हाती लेखणी उचलावी ही निपेक्ष भावना यामागे होती. निबंध स्पर्धेचे विषय १. भारतीय स्वातंत्र्याच्या विकासाची 75 वर्षे २. भारतातील शेतकऱ्याची दशा आणि दिशा ३. वाढती बेरोजगारी व युवकांची भूमिका .या कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

स्वातंत्र्यासाठी राष्ट्रपुरुषाचे योगदान या विषयावर विद्यार्थिनींसाठी दि.1.10.22 रोजी एन.एस.एस. विभागामार्फत व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.रवी मोरे व सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.बी.आय.परदेशी.यांनी केले.सदर कार्यक्रमास कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील उपस्थित होते.सदर कार्यक्रमासाठी कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव. एस.पी.डी.एम.महाविद्यालयाचे भूगोल अभ्यास मंडळाचे सदस्य प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सुनील गोराणे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा हेतू सांगितला.

CamScanner

महाविद्यालयात महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री जयंती यांच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धेचं आयोजन राष्ट्रीय सेवा योजना तर्फे आयोजित करण्यात आले होते. सदर रांगोळी स्पर्धेत दहा विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयाच्या प्राचार्या.डॉ. शारदा शितोळे, व फार्मसी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर एस.पी.डी.महाविद्यालयाचे डॉ. सी एस.गोराणे यांनी प्रतिमेचे पूजन करून रांगोळी स्पर्धेचे निरीक्षण केले. सदर रांगोळी स्पर्धेचे परीक्षक प्रा.विद्या पाटील यांनी महात्मा गांधीजींच्या व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आधारित रांगोळीचे परीक्षण करून कामकाज पाहिले

जागतिक मानसिक आरोग्य दिवसानिमित्त 'मन करा रे प्रसन्न' या विषयावर डॉ.राहुल सनेर सर यांचे दिनांक 10 ऑक्टोबर 22 रोजी व्याख्यानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना तर्फे करण्यात आले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थिनींना ज्वलंत उदाहरण दीली.सदर व्याख्यानास महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने महाविद्यालयात आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयातील ग्रंथालय विभागामध्ये विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन केले. ग्रंथपाल डॉ.एच.एम.चौधरी डॉ.राहुल सनेर सर यांनी 'वाचन संस्कृती व आजचा युवक' या विषयावर विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्लॅस्टिक गोळा करणे ही मोहीम कॉलेजच्याआवारामधे आणि मार्केटमध्ये दिनांक 19 ऑक्टोबर 22 रोजी राबविण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे, प्रा.बी.आय.परदेशी,डॉ.सूनीती आचार्य यांनी राष्ट्रीय सेवा योजना तर्फे आयोजन करण्यात आले. एन.एस.एस.विभागाच्या विद्यार्थ्यांनीनी प्लास्टिक संदर्भात घोषणा देऊन त्याचे मानवी जीवनावर कसा परिणाम होतो त्या संदर्भात माहिती दिली

श्रीमती,एच.आर.पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर. येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती व राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा दि.31ऑक्टोबर 22 रोजी घेण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे, प्रा.बी.आय.परदेशी यांनी राष्ट्रीय सेवा योजना तर्फे आयोजन केले.त्याप्रसंगी माननीय प्राचार्या.डॉ.शारदा शितोळे मॅम यांनी प्रतिमा पूजन करून मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा घेण्यात आली.सदर कार्यक्रमासाठी एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे तसेच प्राध्यापक वृंद व शिक्षिकेत्तर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.15-11-22 रोजी थोर क्रांतिकारक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे, प्रा.बी.आय.परदेशी यांनी राष्ट्रीय सेवा योजना तर्फे आयोजन केले.त्याप्रसंगी माननीय प्राचार्या.डॉ.शारदा शितोळे मॅम यांनी प्रतिमा पूजन करून मार्गदर्शन केले. तसेच प्राध्यापक वृंद व शिक्षिकेत्तर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना व समान संधी केंद्र आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय पर्व दि.-26-11-22 रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे, तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अतुल खोसे, प्रा.बी.आय.परदेशी यांनी राष्ट्रीय सेवा योजना व समान संधी केंद्र तर्फे आयोजन केले.त्याप्रसंगी माननीय प्राचार्या.डॉ.शारदा शितोळे मॅम यांनी प्रतिमा पूजन करून सविधान जाणीव जागृतीवर मार्गदर्शन केले. तसेच मुंबई दहशतवादीत झालेल्या शहिदांना श्रद्धांजली देऊन, संविधान स्वीकृती दिनानिमित्त संविधान वाचन करण्यात आले.संविधानाचे प्रस्ताविक प्रा.बी.परदेशी यांनी करून संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रवीमोरे, उपप्राचार्य डॉ.गजानन पाटील

राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त 06 डिसेंबर 2022 रोजी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 66 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन व प्रतिमा पूजन करण्यात

CamScanner

केले. तसेच प्राध्यापक वृंद व शिक्षिकेत्तर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.रवी मोरे यांनी स्वरूप स्पष्ट

